आवश्यक आहे. परंतु अशा वैज्ञानिक, ज्ञानी माणसाला काही दवाखान्यांमध्ये किंवा रुग्णालयांमध्ये बाजूला ठेवले जाते. त्याच्या अज्ञानाची पारख न करता कार्य चालू राहते. काही मोठ्या शहरांमधील रुग्णालयांमध्ये अशा वैद्यकीय समाजकार्य कर्त्याच्या ज्ञानाची पारक केली जाते नव्हे तर रुग्णालयातील तो अविभाज्य घटक बनलेला पहावयास मिळतो.

**शस्त्रक्रियागार केंद्र:**

खऱ्या अर्थाने शस्त्रक्रिया ही अंतिम उपचार पद्धती मानली जाते. शस्त्रक्रिया पूर्वी अनेक उपाय केले जातात. अशा प्रसंगी रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांना आहार,विहार नियमित औषधोपचार, इत्यादी बाबत वेळोवेळी सल्ला व मार्गदर्शनाची नितांत गरज असते. परंतु सद्य परिस्थितीत वैद्यकीय क्षेत्रामध्ये सल्ला व मार्गदर्शन प्रक्रिया मंदावलेली आढळते. माणसे इतरांचा सल्ला वेळीच घेत नाहीत आणि प्रसंग आलाच तर मदतीसाठी याचना करतात, ही वेळ चुकीची असते. शस्त्रक्रियेपूर्वी डॉक्टरांची नातेवाईकांशी सल्लामसलतिची नितांत गरज असते.

वास्तविक शस्त्रक्रिया विभागात येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना या प्रक्रिये पूर्वीच योग्य मार्गदर्शनाची गरज असते. मनोबल वाढवण्यासाठी आणि धीर देण्यासाठी शस्त्रक्रियेपूर्वी वैद्यकीय समाजकार्यकर्त्याची नितांत गरज असते. नव्हे तर मानसोपचार समाज कार्यकर्ता हा या प्रसंगी महत्त्वाचा ठरू शकतो. औषधी आणि शरीर साथ यांचा मेळ बसवण्यासाठी मानसिक स्वास्थ्य महत्त्वाचे असते. मनोबलाच्या जोरावरच पुढील प्रक्रियेची यशस्विता अवलंबून असते. अशा विभागात येणाऱ्या रुग्ण व नातेवाईकांना वेळोवेळी समजावून सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शस्त्रक्रियेसाठी मानसिक तयारी, आर्थिक तयारी, सामाजिक तयारी करणे या कामी वैद्यकीय समाजकार्यकर्ता महत्त्वाची भूमिका बजावणारा ठरू शकतो. नव्हे तो एक देवदूतच ठरू शकतो. त्यासाठी शांत आणि संयमी वातावरणाची नितांत गरज असते. परिणामी समन्वयातूनच अनेक बाबी सुकर ठरू शकतात.

अशा विभागामध्ये मानवी भावनेतून शिक्षण- प्रशिक्षण घेतलेला समाज कार्यकर्ता आपल्या प्रभावी संभाषण कौशल्याच्या आधारे उत्तम भूमिका पार पाडू शकतो. परंतु काही ग्रामीण आणि अप्रगत क्षेत्रांमध्ये जिथे खरी गरज असते अशा भागांमध्ये अशा वैद्यकीय समाजकार्यकर्त्याला टाळले जाते नव्हे त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यांच्या ज्ञान कौशल्याचा म्हणावा तसा उपयोग वैद्यकीय व्यवस्था घेत नाही. परिणामी अवैद्यकीय कामामध्ये अशा घटकांचा वापर अधिक होत असल्याचे दिसून येते.

**स्त्रीरोग विभाग:**

मुळात स्त्री यांना वेळोवेळी रुग्णालयांमध्ये सल्ला आणि मार्गदर्शन करण्याची नितांत गरज असते हळद या मानाच्या स्त्रियांना वेळोवेळी समजावून सांगणे मनोबल वाढवणे वेळेवर औषधे घेण्याची महत्त्व स्तनपानाचे महत्त्व प्रतिबंधात्मक उपचाराची महत्त्व वेळीच सांगण्याची नितांत गरज असते अशा स्त्रियांचे मनोबल वाढवणे नातेवाईकांची व मदतीची गरज लक्षात आणून देणे इत्यादी बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात खरे तर रुग्ण स्त्रिया आणि त्यांची नाते वाईक यांच्यामध्ये समन्वय घडवून आणणे वेळीच गरजेचे असते लवकर बरे होण्यासाठी याची नितांत आवश्यकता असते. स्त्री वैद्यकीय समाज कार्यकर्ती स्त्रियांच्या अनेक, विविध समस्या समजून घेऊन या क्षेत्रामध्ये प्रभावी कार्याची गरज सद्यपरिस्थितीत अधोरेखित होत आहे, आणि या क्षेत्रामध्ये बदलत्या काळानुसार परिवर्तन करण्याची आज गरज आहे. विशेषतः बाळंत स्त्रियांची विशेष काळजी घेण्यासाठी सल्लामसलतिची आवश्यकता आहे. नवजात बालकांच्या उज्वल भविष्यासाठी आणि मातेच्या सुदृढ

स्वस्थ्यासाठी समाज कार्य हस्तक्षेपाची गरज आहे. अशा महत्त्वाच्या विभागात स्त्री वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्याची भूमिका दिवसेंदिवस प्रकर्षाने जाणवते आहे. परंतु अशाही विभागाकडे दुर्लक्ष केले जात आहे, आणि मानवी वैज्ञानिक भूमिकेतून वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्याच्या विशेष ज्ञानाचा वापर वेळीच योग्य प्रसंगी घेणे ही काळाची गरज आहे.

वास्तविक सद्यपरिस्थितीत रुग्णालयातील या विभागाकडे म्हणावे तसे लक्ष दिले जात नाही उद्याची सुदृढ माताच राष्ट्र उभारणीतील महत्त्वाची शिलेदार ठरू शकते आणि वेळीच हस्तक्षेपाने मातामृत्यू, बालमृत्यू आणि राष्ट्रीय हानी  रोखण्यास मदत होईल हे न करता येत नाही. वास्तव परिस्थितीची जाण आणि भान ठेवून वेळीच हस्तक्षेप आणि सुधारणा यासाठी वैद्यकीय क्षेत्रामध्ये  नव्हे तर व्यवस्थेमध्ये पुरेसे फेरबदल करणे आवश्यक आहे तसेच वैद्यकीय व्यवस्थापनाला वैद्यकीय समाजकार्य क्षेत्राच्या गरजे बाबत आणि अशा वैज्ञानिक ज्ञान कौशल्य आधारित कर्मचाऱ्यांचा उपयोग याबाबत शिक्षण प्रशिक्षणावर वेळीच भर देण्याची गरज आहे. वैद्यकीय क्षेत्रातील क्रांतीमुळे मानवी जीवन सुखकर झालेले आहे हे नाकारता येत नाही. परंतु विज्ञानाच्या अनेक विविध क्षेत्रांच्या समन्वयातूनच व्यक्ती जीवन अधिक सुखकर करण्यासाठी वैद्यकीय समाजकार्य तसेच मानसोपचार कार्य या क्षेत्राची दिवसेंदिवस गरज अधोरेखित होत आहे हे नाकारता येत नाही.

समाजकार्य पदवी व पदव्युत्तर पदवी प्रशिक्षणार्थ्यांनी क्षेत्र कार्याच्या अंतर्गत वैद्यकीय क्षेत्रामध्ये नेत्रदीपक कार्य करण्यासाठी पुढे आले पाहिजे नव्हे तर रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक आनी रुग्णालय व्यवस्थापनामध्ये आज समन्वय घडवून आणण्यासाठी सक्रिय सहभाग घेण्याची नितांत आवश्यकता आहे. गुंतागुंतीच्या या मानवी जीवनाला सुखकर करणे अधिक  सौहार्दपूर्ण समाज निर्मितीसाठी आणि स्वास्थ्यासाठी वेळीच हस्तक्षेपाची गरज आहे . क्षेत्र कार्यातून प्रभावी हस्तक्षेप आज शक्य झालेले आहे आणि अजून खूप कार्य करण्याची गरज आहे. यासाठी शिक्षक, प्रशिक्षणार्थी आणि हस्तक्षेपाची व्यवस्था , प्रशासन यामध्ये सातत्यपूर्ण सहसंबंध व प्रभावी समन्वयाने हे शक्य होणार आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या या जगामध्ये अधिकाधिक संशोधन होत आहे याचा परिणाम आपणास पदोपदी जाणवत आहे व जाणवत राहणार यात मुळीच शंका नाही अशी आशा करूया.

**संदर्भ:**

वैद्यकीय समाजकार्य -डॉ. दा. धो. काचोळे

प्रतिबंधात्मक सामाजिक वैद्यकशास्त्र- डॉ. जे. पार्क

डॉक्टर नसेल तेथे- डॉ.वार्नर 4.वैद्यकीय समाजशास्त्र -डॉ. सुधाताई काळदाते

***Cite This Article:***

***प्रा.डॉ. सुदाम राठोड, (2021). वैद्यकीय समाजकार्य एक दुर्लक्षित क्षेत्र !!,*** *Educreator Research Journal VIII (VI), 81-83.*